राज्यस्तरीय योजनेअंतर्गत वन विभागासाठी फिरत्या पथकाचे सक्षमीकरण (२४०६ २१६१) या योजने अंतर्गत निर्लेखित वाहनांऐवजी नविन वाहने खरेदी करण्यास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक: वाहन-२०१९/प्र.क्र.३१/फ-५.
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २८ मे, २०१९.

संदर्भ : प्रधान मुख्य वन संरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-८/भांडार/वाहन/प्र.क्र.७२(२०१७-१८)/भाग-II/जी-१३७४/२०१८-१९, दि.३१.०१.२०१९.

प्रस्तावना :

राज्य योजनेंतर्गत फिरत्या पथकाचे सक्षमीकरण (२४०६ २१६१) या योजनेंतर्गत वन विभागातील निर्लेखित केलेल्या १५ वाहनांऐवजी १५ नवीन वाहने वाहने खरेदी करण्याचा प्रस्ताव प्रधान मुख्य वन संरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या कार्यालयाच्या उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये शासनाच्या मान्यतेसाठी सादर केला आहे. त्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

वन विभागातील फिरत्या पथकाचे सक्षमीकरण (२४०६ २१६१) या योजनेंतर्गत वन विभागातील १५ निर्लेखित वाहनाच्या बदली त्याच प्रकारची नवीन १५ वाहने (१ कार व ११ जीप रु.६.०० लक्ष प्रमाणे, २ मिनी ट्रक प्रत्येकी रु.१०.०० लक्ष व १ मिनी बस रु.१२.०० लक्ष या मर्यादेत) खरेदी करण्यास राज्यस्तरीय वाहन आढावा समितीने मान्यता दिली आहे. त्यानुसार वन विभागाच्या वाहन आढाव्यात नमूद असलेली व आता निर्लेखित करण्यात आलेल्या सोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद असलेल्या १५ वाहनांच्या (१ कार, ११ जीप, २ मिनी ट्रक व १ मिनी बस) बदली त्याच प्रकरची नवीन १५ वाहने खरेदी करण्यास मान्यता देण्यात येत असून त्यापैकी परिशिष्ट-ब मध्ये दर्शविलेल्या ११ वाहनांच्या बदली ११ वाहने रु.६.०० लक्ष किंमत मर्यादेत (वाहनाची किंमत+विक्रीकर+टेम्परर रजिस्ट्रेशन चार्जेस+मूल्यवर्धित कर+सहाय्यभूत साहित्य इत्यादी अंतर्भूत) खरेदी करण्यास व त्यासाठी येणाऱ्या रु.६६.०० लक्ष (रुपये सहासष्ट लक्ष फक्त) इतक्या खर्चास शासन मान्यता देण्यात येत आहे. उर्वरित ४ वाहनांच्या खरेदी खर्चास, निधी उपलब्धेनुसार मान्यता देण्यात येईल.

२. नवीन वाहने खरेदी करण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) नवीन वाहन विहित कार्यपध्दतीस अनुसरुन खरेदी करण्यात यावे.

२) वित्त विभागाच्या दिनांक २१.०१.२०१७ च्या शासन निर्णयान्वये अधिकाऱ्यांसाठी रु.६ लाखाच्या मर्यादेतच खरेदी करावयाची असून यात करांचा समावेश आहे.

३) नवीन वाहन ज्या अधिकाऱ्यास मंजूर करण्यात आले आहे, त्या अधिकाऱ्यांना सदर वाहनाचा वापर उक्त कार्यालयाच्या शासकीय कामकाजासाठी करावा.

४) वाहन अनुज्ञेय असणाऱ्या एका अधिकाऱ्याच्या वापरात फक्त एकच वाहन असावे.

५) नवीन वाहन खरेदी केल्यानंतर त्यासंबंधी अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

६) परिशिष्ट-अ मध्ये दर्शविलेल्या वाहनांच्या बदली नवीन वाहने खरेदीस मान्यता देण्यात येत असल्याने भविष्यात सदर वाहनाऐवजी नवीन वाहनांची मागणी विभागास करता येणार नाही.

७) प्रस्तुत खरेदी करताना उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि.२४.०८.२०१७ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या खरेदीबाबतच्या अटी व शर्तीनुसार खरेदी प्रक्रियेची कार्यपध्दती अवलंबवावी.

८) वाहन खरेदी GeM Portal वरुन विहित पध्दतीचा अवलंब करुन करण्यात यावी.

३. सदर वाहन खरेदीवर होणारा खर्च "मागणी क्रमांक : सी-७ प्रधान शिर्ष २४०६ वनीकरण व वन्यजीवन, ०१ वनीकरण, १०१ (११) वनसंधारण व विकास (११) (२९) ५२ फिरत्या पथकाचे सक्षमीकरण (राज्य) (२४०६ २१६१), ५१-मोटार वाहने" या लेखाशिर्षाखाली चालू आर्थिक वर्षाकरिता उपलब्ध असणाऱ्या निधीतून भागविण्यात यावा. यामध्ये कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ.संदर्भ क्र.१४१/२०१९/विनियम, दि.२२.०३.२०१९ व अनौ.संदर्भ क्र.५३१/२०१९/व्यय-१०, दि.१०.०५.२०१९ अन्वये प्राप्त मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०५२८१६०६५६५४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUJAY DEORAO DODAL

Digitally signed by SUJAY DEORAO DODAL
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=a6a471816b9dbfd727f2e5ec4825f4678c8393d846acd1c16b8936c8b3a519c6, ou=REVENUE AND FOREST, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SUJAY DEORAO DODAL
Date: 2019.05.28 16:10:24 +05'30'

(सुजय दोडल)

सह सचिव (वने), महसूल व वन विभाग.

प्रत:

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संरक्षण), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व, नागपूर/ पश्चिम, मुंबई.
६) मुख्य वनसंरक्षक (कार्यआयोजना), पूर्व नागपूर/ पश्चिम पुणे.
७) मुख्य वनसंरक्षक (मुल्यांकन), नागपूर.
८) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) नागपूर, कोल्हापूर, ठाणे, अमरावती, धुळे व नाशिक.
९) महालेखापाल १/२ (लेखापरिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
१०) महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.

११) कक्ष अधिकारी (कार्यासन-ब-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

यांना विनंती करण्यात येते की, नमूद शासन निर्णयानुसार रक्कम वितरीत करण्यात यावी.

१२) कक्ष अधिकारी (कार्यासन-फ-२), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

१३) कक्ष अधिकारी (कार्यासन-विनियम/व्यय-१०), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

१४) कार्यासन फ-५ निवड नस्ती.

महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्रमांक : वाहन-२०१९/प्र.क्र.३१/फ-५, दि. २८ मे, २०१९ चे सहपत्र.

परिशिष्ट-अ

अ. क्र.	कार्यालयाचे नाव	उप कार्यालय	वाहनाचा प्रकार	निर्लेखित वाहन क्रमांक	रक्कम
१	मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर.	उपवनसंरक्षक, नागपूर.	जीप	MH-31-AG-9402	रु.६.०० लक्ष
२	मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर.	उपवनसंरक्षक, नागपूर.	जीप	MH-31-AG-9391	रु.६.०० लक्ष
३	मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर.	उपवनसंरक्षक, नागपूर.	जीप	MH-31-AG-9576	रु.६.०० लक्ष
४	मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), कोल्हापूर.	उपवनसंरक्षक, कोल्हापूर	कार	MH-09-AG-0455	रु.६.०० लक्ष
५	अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम, मुंबई.	मुख्य वनसंरक्षक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली.	जीप	MH-02-AK-0031	रु.६.०० लक्ष
६	प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर.	प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय, नागपूर.	जीप	MH-31-AG-9093	रु.६.०० लक्ष
७	मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर.	उपवनसंरक्षक, वर्धा.	जीप	MH-32-J-174	रु.६.०० लक्ष
८	मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), कोल्हापूर	उपवनसंरक्षक, सातारा.	जीप	MH-11-AB-0091	रु.६.०० लक्ष
९	मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), कोल्हापूर	उपवनसंरक्षक, सातारा.	जीप	MH-11-AG-0247	रु.६.०० लक्ष
१०	मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), धुळे	उपवनसंरक्षक, धुळे.	जीप	MH-18-F-0061	रु.६.०० लक्ष
११	मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नाशिक.	मुख्य वन संरक्षक, नाशिक.	जीप	MH-15-AA-5038	रु.६.०० लक्ष
१२	मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), चंद्रपूर.	मुख्य वन संरक्षक, चंद्रपूर	जीप	MH-34-8342	रु.६.०० लक्ष
१३	मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), धुळे	उपवनसंरक्षक, मेवासी विभाग, तळोदा.	मिनी ट्रक	MH-18-G-0007	रु.१०.०० लक्ष
१४	अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नागपूर.	उपवनसंरक्षक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अकोट.	मिनी ट्रक	MH-30-H-5031	रु.१०.०० लक्ष
१५	अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नागपूर.	उपवनसंरक्षक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अकोट.	मिनी बस	MH-30-H-5235	रु.१२.०० लक्ष

महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्रमांक : वाहन-२०१९/प्र.क्र.३१/फ-५, दि. २८ मे, २०१९ चे सहपत्र.

परिशिष्ट-ब

अ. क्र.	कार्यालयाचे नाव	उप कार्यालय	वाहनाचा प्रकार	निर्लेखित वाहन क्रमांक	रक्कम
१	मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर.	उपवनसंरक्षक, नागपूर.	जीप	MH-31-AG-9402	रु.६.०० लक्ष
२	मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर.	उपवनसंरक्षक, नागपूर.	जीप	MH-31-AG-9391	रु.६.०० लक्ष
३	मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर.	उपवनसंरक्षक, नागपूर.	जीप	MH-31-AG-9576	रु.६.०० लक्ष
४	अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम, मुंबई.	मुख्य वनसंरक्षक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली.	जीप	MH-02-AK-0031	रु.६.०० लक्ष
५	प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर.	प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय, नागपूर.	जीप	MH-31-AG-9093	रु.६.०० लक्ष
६	मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर.	उपवनसंरक्षक, वर्धा.	जीप	MH-32-J-174	रु.६.०० लक्ष
७	मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), कोल्हापूर	उपवनसंरक्षक, सातारा.	जीप	MH-11-AB-0091	रु.६.०० लक्ष
८	मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), कोल्हापूर	उपवनसंरक्षक, सातारा.	जीप	MH-11-AG-0247	रु.६.०० लक्ष
९	मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), धुळे	उपवनसंरक्षक, धुळे.	जीप	MH-18-F-0061	रु.६.०० लक्ष
१०	मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नाशिक.	मुख्य वन संरक्षक, नाशिक.	जीप	MH-15-AA-5038	रु.६.०० लक्ष
११	मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), चंद्रपूर.	मुख्य वन संरक्षक, चंद्रपूर	जीप	MH-34-8342	रु.६.०० लक्ष
				एकूण -	रु.६६.०० लक्ष

(एकूण रुपये सहासष्ट लक्ष फक्त)

****